महाराष्ट्र पोलीस
सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

**जनसंपर्क अधिकारी पोलीस आयुक्तालय,**
**ठाणे शहर**
इमेल–cp.thane.pro@mahapolice.gov.in
**भ्रमरध्वणी क्र.९८१९२०८२७९**

**प्रेसनोट** **दि.२८.०९.२०२४**

## “गुन्हे शाखा, घटक–४, उल्हासनगर यांचेकडुन घरफोडी चोरीचा गुन्हा उघडकीस तीन आरोपी जेरबंद”

दिनांक २३.०८.२०२४ ते दिनांक २४.०८.२०२४ रोजीचे दरम्यान एमआयडीसी, अंबरनाथ पश्चिम येथे फिर्यादी श्री.मुकेश राधाकिशन परदेशी, वय ४१ वर्षे, व्यवसाय नोकरी, रा.कल्याण पश्चिम यांचे मालकीचा अशोक लेलॅड कंपनीचा टेंपो ,एल.जी.कंपनीचा एक एसी., एक मायक्रोटेक कंपनीचा इन्व्हर्टर, एक कॉम्प्युटर असा एकुण ५,७५,०००/–रूपये किमंतीचा मुद्देमाल घरफोडी चोरी झाला होता. त्याबाबत त्यानी अंबरनाथ पोलीस ठाणे येथे गु.रजि.क्र. ११९५/२४ भारतीय न्याय संहिता कलम ३०५ (अ), ३३१(४) प्रमाणे गुन्हा दाखल केला होता.

सदर गुन्ह्याचा अबरनाथ पोलीस ठाणे व गुन्हे शाखा, घटक–४ उल्हासनगर चे पोलीस समांतर तपास करीत होते. गुन्हे शाखा, घटक–४ उल्हासनगर चे पोलीसांनी कोणताही धागादोरा नसताना अतिशय कौशल्यपुर्वक तपास करून आरोपी क्र.१)समीर सगिर हाशमी, वय ३५ वर्षे, रा.नवनाथ नगर, डोंबिवली पूर्व २) इसरारअली नासीर अली खान उर्फ आरीफ, वय ३४ वर्षे, रा.उल्हासनगर ३) शकील सलाम खान, वय ४० वर्षे, रा.उल्हासनगर–४ यांना ताब्यात घेवुन त्यांची विचारपुस केली असता, त्यांनी सदर घरफोडी चोरीचा गुन्हा केला असल्याचे तपासात कबुल केले आहे. त्यांचेकडुन वरिल वर्णनाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असुन नमुद गुन्हयातील तीनही आरोपींना अटक करण्यात आली आहे. सदर आरोपींकडुन घरफोडी चोरीचे आणखी काही गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता असल्याने त्याबाबत तपास चालु आहे.

( शैलेश साळवी )
वरिष्ठ पोलीस निरीक्षक तथा जनसंपर्क
अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर